IMPACT FACTOR
5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
*Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal*
ISSN
2455-4375

# आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची वैशिष्ट्ये

**विकास नामदेव लोडे**
संशोधक विद्यार्थी
रा. नवरगांव पो. सुकनेगांव ता. वणी
जि. यवतमाळ — ४४५३०४
७३५०५८३०२१
vikaslode981@gmail.com

**प्रस्तावना : —**

आंबेडकरवादी साहित्य हा इ. स. १९६० नंतर निर्माण झालेला एक महत्त्वाचा वाङ्मयप्रवाह आहे. हा प्रकार साहित्य प्रवाह परिवर्तनाच्या चळवळीतून उदयास आला. या साहित्याला जीवनवादी साहित्य म्हणता येईल कारण या साहित्यातील जीवनवादाला महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे अधिष्ठान आहे. हे साहित्य आंबेडकराच्या विचारावर आधारित असल्याने परिवर्तनवादी विचारांशी बांधिलकी मानणारे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक तत्वज्ञान निर्माण केले आणि संपूर्ण समाज परिवर्तनाचे साधन म्हणून दलित साहित्य पुढे आले, विशेषत: आंबेडकरवादी कवयित्रीच्या कवितामधून नकार, विद्रोह, मानवता, विज्ञाननिष्ठ दृष्टी ही आंबेडकरवादी कवितेची तत्त्वे मानता येतील. डॉ. आंबेडकरांनी समाजाला आत्मभान दिले दलितांना माणुस म्हणून जगणे नाकारणाऱ्या व्यवस्थेविरूध्द लढा पुकारला तसाच लढा आजच्या कवयित्रीच्या कवितामधून अनुभवास येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार व चळवळ प्रेरणास्थानी असलेल्या साहित्यात कविता ह्या महत्वाच्या प्रकारावर लेखन फार होतांना दिसते. दलित साहित्यातील महत्त्वाचा आणि प्रभावी वाङ्मयप्रकार म्हणजे कविता होय. कवितेमध्ये लेखकानी आपले दु:ख थोडक्या शब्दात मार्मिकपणे स्पष्ट करण्यासाठी 'कविते'सारखा वाचकांच्या डोळ्यात चटकन भरणारा वाङ्मयप्रकार निवडला दलित कवितेतील जीवनचित्रण कशाप्रकारे आहे ते कवितेच्या आधारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**स्त्रीच्या भावनेचा उद्रेक :—**

स्त्रियांवर मागील काळापासून अन्याय होतांना दिसतो पण आता स्त्री शिक्षणाने जागृत झाली ती लिहू लागली बोलू लागली तीच्यावर परंपरेने अन्यायच लादलेला दिसतो. तिच्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात 'जाब' विचारण्याचे सामर्थ्य तिच्या अंगी आले हे सामर्थ्य आले कोठून? कमल कदम यांच्या 'जाब' मधील कविता वाचल्यानंतर असे लक्षात येते की, दलित स्त्रीला बळ बाबासाहेब आंबेडकराच्या वादळी आणि विद्रोही सामाजिक तत्वज्ञानातून प्राप्त झाली आहे. स्त्रीला स्वत्वाची जाणीव झाली आहे त्यामुळे 'मी कोण' या प्रश्नाचे उत्तर देतांना —

''एक तीर मी,आर मी पार मी
तलवारीची धार मी
आग मी जाग मी.............

अशी ती स्वत:ची ओळख करून देते. या ओळख करून दिलेल्या रूपात प्रित आहे गीत आहे आणि जीत ही आहे. ती अगदी आत्मविश्वासाने 'जीवनाचा अर्थ मी असे सांगते.

**स्वातंत्र्याची मागणी :—**

भारतीय समाज व्यवस्था—जातीव्यवस्था नि स्त्रियांची गुलामगीरी हे अत्यंत जटील प्रश्न आजच्या कवयित्रीनी समजुन घेतले. इथे स्त्रीला गुलामीची वागणूक दिली जाते स्त्रीला गुलाम म्हणून वागवायच; पण आपण खरोखरच गुलामीच्या जोखडात का जगतो, या मागची कारणं काय याचा विचार करण्याची संधी त्याना दिली गेली नाही. स्त्री ही हिन ठेवण्यामागच कारस्थान आर्यानी केल ते परकीय राष्ट्रातून टोळीरूपात इथे आले त्यांना इथल्या स्त्रीयांना हिन दर्जाची वागणूक दिली ती आतापर्यत चालू आहे. या पारंपरिक गुलामगिरीचे आकलन प्रतिभा अहिरे यांच्या 'मला हवी असणारी पहाट' या काव्यसंग्रहात पहायला सापडते. सर्व स्तरातल्या स्त्रीयांनी आपण 'सखी' आहोत किंवा त्या सर्व आपल्या सख्या आहेत, त्यांच्यात नि आपल्यात कुठलाच भेदभाव नाही असे त्यांना वाटते सखी समजून त्यांच्याशी सवांद करतात.

''तुझी घुमसट तुजं गुदमरणं
या तथाकथित आपल्याच समाज, संस्कृती अन्
या नियमाच्या ढिगाऱ्याखाली होनाऱ्या माझ्या तडफडीपेक्षा
निराळं असू शकतं का?''

कवयित्री इथल्या 'स्त्री' या गुलाम संस्थेचा इतिहास सहज आपल्या शब्दात पकडण्याचा प्रयत्न करते व आपल्या गुलामीच्या कवचातुन, पिंजरे तोडून बाहेर येण्याची आवश्यकता प्रतीपादन करते.

**जुन्या रूढी परंपरा, वर्ण, वर्ग, जुनी मूल्ये, पुराण संस्कृतीला नकार :—**

कवयित्री संध्या रंगारी यांनी मराठवाड्यातील दलित कवितेत स्वत:चा वेगळा ठसा उमटविला. शालेय शिक्षण घेत असताना आपल्या मनातील, अवतीभोवतीच्या स्त्रियांच्या वेदनांचे सूक्ष्म आलेख रेखाटले. रंगारीची कवीता वर्ण, वर्ग, जून्या रूढी—परंपरा. जुनी मूल्ये पुराण संस्कृतीला नाकारते आणि नवीन मानसिकतेची जोपासना करते. 'आघात' काव्यसंग्रहातील कविता म. फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीकारी विचाराचे लेणे लेवून मनुष्य त्याचे मोल जपण्याचे काम करते.

''संस्कृतीच्या नावावर
धुडगूस घालणारांनो
तुम्हाला, माझ्या शब्दांनीच
वठणीवर आणणारा आहे.....!''

संध्या रंगारी यांची 'आघात' मधील कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाचा वसा घेऊन समर्थपणे आत्मशोधाच्या मार्गाचा अवलंब करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराची ठिणगी घेऊन दलित स्त्रीच्या मनात काव्यरूपाने अंत:स्फोट करते. दलित स्त्रीच्या दु:खामागे हजारो वर्षाची परंपरा आहे. संध्या रंगारी सांस्कृतिक परंपरा संघर्षाचे चित्र रेखाटते.

**प्रेमाचा आविष्कार :—**

कमल कदम यांच्या कवितामधून स्त्री मनाच्या कोंडमाऱ्याचे जसे चित्रण आलेले आहे. तसे प्रेमभावाचेही चित्रण आलेले आहे.' काजवा आणि दीपक' यांच्या प्रतीकात्मक रूपाने प्रेमानुभूती प्रगट झाली आहे.

''फिरकला जवळपास
पण लागली खास
जीवघेणी आंच!
बिचारा काजवा
चरकला मनात
जळत्या हृदयाचे
घेऊन कोलीत
फिरतो शोधीत
हरवलेली वाट....!''

या ठिकाणी कवी कुसुमाग्रजांच्या कवितेतील प्रेमानुभूतीची आठवण आल्याशिवाय राहत नाही. त्यांनी प्रेमाविषयी म्हटले आहे. 'प्रेम म्हणजे जळत राहणं' त्याचा प्रत्यय या ठिकाणी येतो. निसर्गातील प्रतिमांचा परिणामकारक वापर करून कवयित्रीने प्रेमभाव मांडला असला तरी वरिल कवितेतील प्रेयशी ही अबोल दाखवलेली आहे.

**स्त्रीवादाचा पुरस्कार :—**

कवयित्री प्रतिभा अहिरे यांच्या कवितामधून स्त्रीवाद दिसून येतो. स्त्री रूढीवादी असली तर समाज रूढीवादी होतो कारण स्त्री ही संस्कारशाळा आहे. पण परिवर्तन ज्यांना नको आहे. ते या संस्कारशाळेचा अभ्यासक्रम केवळ आपल्या हितासाठी राबवतात स्त्रीच्या मनुष्यत्वाच्या पडझडीचे उगम इथे आहे, स्त्रीला गुलाम करणाऱ्या धर्मापासून, तत्वज्ञानापासून आणि अशा सर्वच संस्कारापासून वेगळे करता आले पाहिजे भारताच्या संपूर्ण इहवादी परंपरेमध्ये स्त्रीवादाची बीजे विखुरलेली आहे. जोतीबा आणि सावित्रीबाई फुले, आगरकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारात आणि कार्यात स्त्रीवाद साकार झाला आहे. प्रतिभा अहिरे यांच्या काव्यात आंबेडकरी स्त्रीवादाचे विद्रोही हुंकार साकार झाले आहे.

''आपल्या भोंड्या हाता—हातात अशोकाची रोपं
रोमारोमात बाबासाहेब रूजलेला अन् पायापायात सावित्रीचं बळ.......''

आपल्या उजेडाच्या माहेर घराची नोंद इथे केलेली आहे. या काव्यातून उफाळणाऱ्या स्त्रीवादाचा हा आशय विद्रोह विद्रोही आहे. या स्त्रीवादाचा कवयित्रीने या संग्रहातून पुरस्कार केला आहे.

**समुहमनाची वेदना प्रगट करणारी :—**

दलित कविता ही समुहमनाची वेदना प्रगट करणारी आहे. त्यामुळे प्रतिमांकित अभिव्यक्तितून वेदनेचा प्रत्यय येतो. भूतकाळापासून समकाळापर्यंतच्या वेदनेचा प्रवाहीपणा या अभिव्यक्तितून प्रत्ययाला येतो.

आयुष्यभर अंधार जगणारे प्रकाशाचा कांचनमृम न पाहिलेले
जीवनमरणाच्या अर्थहीन झोळीतून फरफटत नेतात आयुष्याचे निरर्थक ओझे
प्राचीन जखमांचा संगम होतो । अर्वाचीन वेदनांच्या जळत्या बिंदुशी
(हिरा बनसोडे, फिर्याद)

अंधार ही प्रतिमा दलित कवितेत वारंवार येताना दिसते. अंधाराच्या आधिक्यातून उपेक्षितांच्या जगाचा काळेखी विराटपणा, अथांगता आणि सर्वव्यापित्व स्पष्ट होते. प्रतिमासंघटनातून जीवनाची अर्थहिनता, निरर्थकता, वेदना आणि दाहकता प्रत्ययाला येते. अंधार जगणारे जग अर्वाचीनतेशी संबंधित असले तरी या जगाच्या दु:खाचा आरंभ प्राचीनतेशी आहे. म्हणजे दु:खाचा प्रवास प्राचीन ते अर्वाचीन, भूतकाळ ते समकाळ असा प्रवाहित झाला आहे. असे म्हणता येईल.

**नाते संबंधाचे दर्शन :—**

दलित कवितेत कवयित्रीच्या कवितेतील प्रिया, सखी ह्या प्रतिमा आपले वगळेपण सिध्द करणाऱ्या आहेत.

''स्वप्न असतात भंगण्यासाठी
तुला कितीदा सांगितलं
मला असे फुलांच्या राज्यात हिंडवू नको
फक्त उभी राहायला जमीन दे''  (मीना गजभिये)

स्वच्छंदी प्रवृत्तीत जखडून घेण्यापेक्षा आधाराचा हण्यास असणारी जाणीव येथे प्रगट झालेली दिसते या जाणिवेला जगण्यातील वास्तवाचे भान आहे. शृंगारापेक्षा जगण्याच्या वास्तवाचे असणारे भान येथे अधिक ठळक होत जाते. जीवनामध्ये उभे राहण्यासाठी तिला प्रियकरांच्या आधाराची गरज आहे. 'उभी राहायला जमीन दे' ही प्रियकराकडे केलेली मागणी, स्वप्नाची भूमी नाकारून वास्तवाची भूमी स्विकारणारी जाणीव साक्षात करते असे म्हणता येईल. दलित कवितेत स्त्री जाणिवेचा एक यौनसुलभ कप्पा अधोरेखित झाला आहे. प्रज्ञा लोखंडे यांच्या 'अंत:स्थ' या कविता संग्रहातील कवितेत त्याचा प्रत्यय येतो कवितागत 'मी' आणि 'तो' चे एक व्दंव्द प्रगट झाले आहे.

**क्रांतीकारी विचाराचा प्रत्यय :—**

१९ व्या शतकात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नसतानाही आद्य शिक्षिका म्हणून सावित्री बाईंनी जे समाजकार्य केले ते कौतुकास्पट आहे. तथाकथित ब्राम्हण वर्गीयांकडून स्त्रियांना शिक्षणास विरोध होत असतानाही खुद सावित्रीबाईंनी दगड धोंड्याचा, शेणा—चिखलाचा यारा सहन करूनही ध्येयापासून वंचित न होता जोतिबाच्या सोबतीने समाजसुधारणेची धूरा जिद्दीने स्वत:च्या खांद्यावर सांभाळली. आपल्या कृती — उक्ती आणि विचारांनी सामजिक आगतिमान मुल्यांना धारेवर धरले यामुळेच त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीत क्रांतिकारी विचाराचा प्रत्यय येतो.

''उठा बंधूंनो अतिशुद्रांनो, जागे होऊनि उडा
परंपरेची गुलामगिरीही तोडण्यासाठी उठा !
बंधूंनो शिकण्यासाठी उठा...!''

असे तळमळीने शैक्षणिक तत्वज्ञान सांगून अज्ञान, गतनुगतिकता, भ्रामक समजुती यांच्या विळख्यात गुरफटलेल्या शुद्रातिशुद्रांना शिक्षणाचे अमृत पाजले. शिक्षण घेण्यास कुणीही टाळाटाळी केल्यास आपण भोगीत असलेली आजची दुर्दशा पुढील पिढीस भोगणे क्रमप्राप्त ठरेल. असे नानाविध दाखले देऊन सावित्रीबाईंनी पटवून सांगितले.

**दारिद्र्य आणि अस्पृश्यतेचे वर्णन :—**

दया पवारांच्या कवितेत दारिद्र्य आणि अस्पृश्यतेच्या विषमतावादी समाज जाणिवांनी दया पवारांचे जीवन साकारलेले आहे. त्यामुळे दु:खाचा एक अखंड आलेख त्यांच्या काव्यातून आपोआपच चितारला जातो. जीवनाच्या वाटचालीत सोसावे लागलेले हिमखंडासम दु:ख पाहूनही जगण्यापासून आपली नाळ ते तोडू इच्छित नाही. अस्पृश्यता, दु:ख पोरकेपणा, मनाचा दुभगलेपणा यासारखी असंख्य कटू जीवनसत्ये आहेत. परंतू त्यांना टक्कर देऊनही जगण्याची उर्मी आहे.

''दारिद्र्य आणि अस्पृश्यतायांच्या चटक्यानी व्याकुळ झालेले मन पवारांच्या कवितेतून प्रगट होते. जीवनाच्या वाटचालीत येत गेलेले अनुभव आणि डॉ. आंबेडकरांच्या चळवळीने त्यांच्याकडे पाहण्याची दिलेल दृष्टी या दोन्हीतून पवारांची कविता साकार होऊ लागते''

''धारदार सुळ्यांच्या दरवाजाला
हत्ती जसे चिपा होतात
तसे आपण हसत मरावे (मरण, कोंडवाडा)

ही एका अंगाने जीवनाच्या नाहक भोगवस्थाची जाणिव आहे. तर दुसऱ्या अंगाने त्यांच्या कवितेचा विचार केल्यास ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर, चोखामेळा, मार्क्स, येशू यांच्या तत्वज्ञानाशी बांधलेली दिसते. म्हणून डॉ. आंबेडकरांच्या विचारशक्तीचे सामर्थ्य मांडतांना ते प्रामाणिकपणे—

''बाबा, तुम्ही म्हणालात तेच खरे
मेषपात्र जगण्यापेक्षा
सिंह होऊन जगा !''

असा संदेशही या समाज व्यवस्थेला देण्यास मागेपुढे पाहत नाही. बाबासाहेबाच्या तत्वज्ञानाचे रक्त त्यांच्या शरीरात विचाराप्रमाणे भिनलेले आहे.

**जातिव्यवस्थेचे प्रखर दर्शन :—**

हजारो वर्षापासून जातिव्यवस्थेपोटी समाजाला आणि जीवनाला सहन कराव्या लागणाऱ्या यातना दया पवारांच्या काव्यात गवसतात या यातनाची निर्मिती जन्मापासून वाट्याला घातल्याची संवेदना ते आपल्या जीवनाला उलगडून दाखवितांना व्यक्त करतात गतकाळातील जातीव्यवस्थेचा भोगवटा मांडतांना मनातील कल्लोळ गांधीलमाशीसारखा मनाला डसत असल्याचे निवेदनही येते. मात्र रायरंद आणि जलसाकारांनी दलित समाजात जी नवी जागृती केली त्यामुळे दलित समाजाचे भावविश्व बदलल्याचे पवारांनी सांगीतले. तरीसुध्दा जातीव्यवस्थेपोटी गांधीजन्म शताब्दीला वाट्याला आलेल्या जळजळीत वेदना, पंगत उकिरड्यावर बसविणे आमच्यापर्यंत येंतानांच शिरा संपणे, सर्वाच्याच अन्नात माती कालवणे, रथाला म्हारडा शिवणे, माणसं अस्पृश्य म्हणून कोंडून मारणे, चोखा का बाहेरी, माणुस मानसा खाई या सारख्या अनेक प्रसंगातून जातीव्यवस्थेची प्रखर जाणिव व्यक्त होते.

डबक्यात शेवाळ पसरावे अशी गत भारतीय समाज व्यवस्थेतील जातीने सामान्य माणसाची केली आहे. दुतर्फा फुटपाथला झोपून कैक रात्र काढणारे हे मानसाचे जग अन्याय, अत्यचाराचे जोखड घेऊन दिवस कंठणारे आहेत. त्यामुळे जातीने पिढ्यानुपिढ्या वाट्याला आलेले भोग पेलण्याशिवाय पर्याय नसतो. समाजातील राजकारणाचा वापर उच्चभ्रू समजली जाणारी माणसे सहजपणे जातीच्या नावाने करूण घेतात. पाण्यात मासे झोप घेतल्यागत इथल्या मानसाचे चाळीचाळीत कोणतीही कुरकुर न करता जगणे आहे.

**निष्कर्ष :–**

१. दलित साहित्य व विविध लेखीकांची पकड असल्याचे निदर्शनास येते म्हणजेच महिलांचा त्यात पुढीलपणे सहभाग आहे.

२. कवयित्रीच्या कवितेचा मुख्य गाभा महणजे ग्रामिण भागातील उपेक्षा, वेदना आणि गुलामीच्या समस्याना जास्त प्रमाणात सामोरे जावे लागले आहे.

३. दलित साहित्यातील धग आंबेडकरवादी कवयित्रीच्या कवितामधून प्रत्ययास येतो.

४. दलित जीवनाविषयी दलित व दलितेतर लेखिका यानी कविता लेखन केलेले आहे. दलितेवर लेखिकांचे साहित्य सहवेदनेचे आहे.

५. दलित जीवनातील सामाजिक आणि संस्कृती वैशिष्ट्ये नोंदवितांना ती लोकजीवनाशी, ग्रामजीवनाशी संबंधित आढळतात.

६. दलित कवितेमधून समाजभाषा–लोकभाषा यांचा आढळ विपूलप्रमाणात आढळतो, त्यामुळे लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्याशी दलित साहित्याचा संदर्भ तपासता येतो. आयुष्यातील समस्या वेगवेगळ्या असल्या तरी ग्रामीण लोकजीवनातील संदर्भ काही ठिकाणी सारखे आढळतात.

७. दलित कविता म्हणजे सत्याचा जनू आविष्कारच आहे. असे दिसते.

८. दलित कवितेत डॉ. आंबेडकर हे कवयित्रीची प्रेरणा असल्याचे दिसते.

९. व्यवस्थेने लादलेल्या गुलामीमुळे दलित कवितेत प्रतिके साकार झाली आहे. तसेच मुक्तीच्या जाणिवेतून प्रतिके सिध्द झाली आहे. दलित कवितेने 'बुध्द', 'म. फुले', 'रमाई', सह 'आंबेडकर' प्रतिक सिध्द केले आहे.

**सारांश :–**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले इत्यादीच्या जाणीवेचा प्रकाश दलितांच्या जीवनात म्हणजेच दलित कवयित्रीच्या मनामध्ये भीनला आणि दलित कवितेला नवी धर, नवी वाट मिळाली. शुद्राची अवस्था अतिशय हलाखीची होती त्या पलीकडील अवस्था अतिशुद्राची दिसते. जनावरापेक्षा भयंकर जीवन त्यांच्या माथी मारलेले आहेत. याचाच धागा पकडून कवयित्रीनी आपल्याला अनुभव आलेल्या व्यथा, वेदना कवितेतून व्यक्त केला. समाजातील दलितांच्या समस्या यांचे शोधन केले असे दितसे की, दलित कवितेतून अस्सल सत्य प्रत्ययास येत आणि त्यातून समाजातील रंजल्या गांजल्या व्यक्तींना आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणिव कवितेतून होतांना प्रकर्षाने जाणवते.

निसर्ग, पारिवारिक संदर्भ प्रेमविषय भावना या अस्सल असल्याचे दिसते. त्या अनुभवलेल्या असल्याने त्यात कवितेतून जीवंत पाझरत आहेत. आणि परिवर्तनाची नांदी, परिवर्तनाचा एक विचार त्याच्या कवितामधून स्पष्ट जाणवतो. दलित कविता ही मनाला भ्रणारी आहेत कारण त्यात ग्रामीण जीवनाचे, ग्रामिण बोलीचे तत्व आढळते. समाजभाषा, लोकभाषा विपूल प्रमाणात आढळतो. त्यामुळे लोकसाहित्य आणि ग्रामिण साहित्य यातील संदर्भ अनुभवता येतात. डॉ. आबेडकरांनी सांगीतलेला बौध्द धम्म हा विज्ञानवादी विवेकी आणि मानवतावादाचा विचार करणारा असल्याने सर्व समस्याचे निराकरण या धम्माच्या माध्यमातून होऊ शकते अशी भूमिका दलित कवयित्री घेतात.

दलित कवयित्रीच्या कवितात धर्म, कर्मकांड, पंथ, गट, तट, किंवा पक्ष नसून संपूर्ण मानवसमूहाला त्यंचा भाव संवेदनासह वैज्ञानिक जाणिवेकडे नेणारा आणि संस्कारशील बनवणारा प्रवाह आहे. त्याममधून

मानसाचे मूल्य, मानवतावाद, जोपासला जातो, समता, बंधूता आणि न्याय दिला जातो. कुणीही श्रेष्ठ–कनिष्ठ, गोर–गरीब किंवा श्रीमंत राहत नाही. स्त्री–पुरूष विषमता नाही. त्यामुळे सर्वच स्तराच्या माणसांचे साहित्य हे आंबेडकरवादी साहित्य म्हणून उदयास आले.

**संदर्भ ग्रंथ :–**

१. महेंद्र भवरे, दलित कविता आणि प्रतिमा ,लोकवाङ्मय गृह, मुंबई.
२. डॉ. अनंता सूर, दया पवाराची कविता आकलन आणि आस्वाद, देवयानी प्रकाशन, मुंबई.
३. डॉ. के. जी. सोनकांबळे, मराठी दलित कविता आशय आणि अभिव्यक्ती, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
४. डॉ. म. सु. पगारे, दलित साहित्य, दिलीपराज प्रकाशन, पुणे.
५. डॉ. वि. स. जोग, सावरकर आंबेडकर विचारसमिक्षा, लाखे प्रकाशन, नागपूर.